# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.05.2025** **वार:सोमवार**

1. वेव्हज परिषदेचा मुंबईत काल समारोप, वेव्हज बाजारात तेराशे कोटींपेक्षा जास्त रक्कमेची उलाढाल
2. तांदळाच्या अस्सल भारतीय जिनोम संवर्धित दोन वाणांच लोकार्पण
3. महापर्यटन उत्सवाच्या समारोपात पर्यटन दिनदर्शिका सुरु करण्याची मुख्यमंत्र्याची सूचना आणि
4. राज्यात विविध ठिकाणी नऊ तारखेपर्यंत वादळी पावसाचा इशारा

**Waves समारोप**

गेल्या 4 दिवसांपासून मुंबईत सुरू असलेल्या WAVES 2025 अर्थात जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेचा काल समारोप झाला. देशवासियांच्या उदंड प्रतिसादामुळं या परिषदेचं रूपांतर एका त्सुनामीत झाल्याचं मत माहिती प्रसारण खात्याचे सचिव संजय जाजू यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केलं. परिषदेच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करताना ते म्हणाले...

**अपने आप में एक अविस्मरणीय रहा है। ना केवल इंटरनेशनल पार्टिसिपेशन बहुत जोरदार था साथ ही साथ बिजनेस भी बहुत हुआ है इन्वेस्टमेंट अनाउंसमेंट हुए है आह वे इस बाजार में खरीद फरोख्त हुई है। वर्ल्ड के टॉप मीडिया एंटरटेनमेंट कंपनी यहाँ पर शामिल रही कल्चरल प्रोग्राम बहुत अच्छे रहे किसी किस्म का हमें कोई कंप्लेंट यहाँ पर नहीं मिला और अपने आप में एक पीपल्स वेव बन के निकल के आया है ये पहला एडिशन थैंक यू वेरी मच।**

WAVES2025 बद्दलचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून...

**पहिल्यावहिल्या WAVES ला या क्षेत्रातल्या विविध लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. WAVES चा एक भाग म्हणून आयोजित केलेल्या WAVES Bazaar मध्ये या चार दिवसांमध्ये 1 हजार 300 कोटींपेक्षा अधिक रकमेची उलाढाल झाली. WAVESX च्या माध्यमातून 15 ते 16 स्टार्टअप्सची गुंतवणूकदारांशी चर्चा सुरू असून यातून 50 कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. राज्य सरकारने या परिषदेत सुमारे 8 हजार कोटी रुपयांचे विविध सामंजस्य करार केले. परिषदेच्या शेवटच्या दिवशी काल हजारो लोकांनी इथल्या प्रदर्शनांना भेट देऊन माध्यम, तंत्रज्ञान, तसंच आणि मनोरंजन क्षेत्रात सध्या सुरू असलेलं काम आणि घडामोडी जाणून घेतल्या. याशिवाय WAVES मध्ये झालेल्या विविध स्पर्धेतल्या अंतिम फेरीतल्या विजेत्यांचं सादरीकरणही काल झालं. वाह उस्ताद, सिंफनी ऑफ इंडिया, Battle of Bands आणि EDM चॅलेंजच्या विजेत्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून, अंकिता आपटे.**

**कृषिमंत्री**

भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे विकसित करण्यात आलेल्या अस्सल भारतीय जिनोम संवर्धित तांदुळाच्या दोन वाणांचं लोकार्पण केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यानी काल नवी दिल्लीत केलं. देशाच्या दृष्टीनं हा दिवस ऐतिहासिक असून, तांदुळाच्या या भारतीय वाणांमुळे भाताच्या पिकाचं उत्पादन वाढेल आणि उत्पादन खर्चात घट होईल असं चौहान म्हणाले तसच हे संशोधन करणाऱ्या कृषी शास्त्रज्ञांचं त्यांनी अभिनंदन केल.

**संमेलन**

अमेरिकेतल्या वॉशिंग्टन इथं आजपासून 8 मे पर्यंत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक बँक भूमी संमेलनामध्ये भारत, भूमी सुधारणा चर्चासत्राचं नेतृत्व करणार आहे. पंचायत राज मंत्रालयाचे सचिव विवेक भारद्वाज यांच्या नेतृत्वाखालील भारताचं प्रतिनिधी मंडळ यात भाग घेणार असून भूमी स्वामित्व योजनेचं सादरीकरण करणार आहे. 'हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर भूमीचं रक्षण आणि स्वामित्व हक्क याबाबत जागृतीकडून कृतीकडे' ही यावर्षीच्या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. भारतात जमिनीचा मालकी हक्क सुरक्षित करण्यासाठी भारत सरकारच्या वतीनं स्वामित्व ही योजना राबवण्यात आली. यामध्ये ड्रोन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागातील मालकी हक्काच्या शेतजमीन आणि इतर जमिनीची मोजणी करण्यात आली आणि देशातल्या 1 लाख 60 हजार गावांमध्ये सुमारे 2 कोटी 44 लाखांपेक्षा जास्त मालकीहक्क जमिनीची कार्ड वितरित करण्यात आली आहेत.

**भेट**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय वायु दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

**मुख्यमंत्री**

राज्यात पर्यटन विकासासाठी वर्षभराचं वेळापत्रक तयार करून राज्याच्या विविध भागात आयोजित उत्सव सोहळ्यांचा त्यात समावेश करावा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल महाबळेश्वर इथं दिल्या. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीनं महाबळेश्वर इथं आयोजित महापर्यटन उत्सवाचा समारोप काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. देशातील टूर ऑपरेटर्ससोबत कार्यशाळा घेऊन त्यांना इथल्या पर्यटन सुविधांची माहिती द्यावी. तसंच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकाच पोर्टलवर सर्व पर्यटन सुविधांची माहिती द्यावी असंही फडणवीस यांनी सुचविलं. विधान परिषदेचे उपसभापती राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले आदि यावेळी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुनावळे इथं शिवसागर जलशयातील 10 जेट स्कीचे लोकार्पण करण्यात आलं. पर्यटन महोत्सवला सहकार्य करणाऱ्या क्लब महाबळेश्वरच्या अध्यक्ष मनीषा गोखले यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं घेतलेल्या, इयत्ता 12 वीच्या परीक्षेचा निकाल, आज दुपारी 1 वाजता जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण, मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

**साप-विष**

शास्त्रज्ञांनी 18 वर्षांपासून सापाच्या विषाचं इंजेक्शन स्वतःला देऊन रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करणाऱ्या एका माणसाच्या प्रतिपिंडांचा वापर करून, सापाच्या विषावरील आजपर्यंतचं सर्वात व्यापक आणि परिणामकारक औषध तयार केलं आहे. सेल जर्नलमध्ये प्रकाशित या संशोधनात, हे औषध ब्लॅक मांबा, किंग कोब्रा आणि टायगर स्नेकसह अनेक अतिविषारी सापांपासून संरक्षण करतं असं दिसून आलं. फुरसेसारख्या विषारी सापांच्या इतर प्रजातींच्या विषावरील उतारा समाविष्ट करण्यासाठी हे शास्त्रज्ञ आता संशोधन करणार आहेत.

**कावीळ साथ–अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर इथं काविळीची साथ सुरू असून, यामुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे तर कावीळच्या रूग्णांची संख्या 263 झाली आहे. या संदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रुग्णालयात जाऊन रुग्णांची भेट घेतली आणि डॉक्टरांकडून उपचारांची माहिती जाणून घेतली. राजूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत

ग्रामस्थ आणि रूग्णासाठी उभारलेल्या विशेष उपचार कक्षालाही विखे पाटील यांनी भेट दिली. राजूरच्या घटनेचं गांभीर्य लक्षात घेवून जिल्ह्यातील सर्वच पाण्याचे स्त्रोत तपासण्याचे निर्देश पाटील यांनी दिले आहेत.

**भाषा**

कोट्यवधी मराठी भाषक असूनही मराठी भाषाविज्ञान हा महत्त्वाचा विषय महाराष्ट्रात दुर्लक्षित आहे. राज्याच्या कुठल्याही विद्यापीठात मराठी भाषाविज्ञान शिकण्याची सोय नाही; कारण मराठी भाषेत ते कुठंही शिकवलं जात नाही, अशी खंत ज्येष्ठ भाषातज्ज्ञ प्राध्यापक प्र. ना. परांजपे यांनी काल पुण्यात व्यक्त केली. मराठीचं भाषाविज्ञान शिकण्याची सोय मराठीमध्येच हवी, असं आग्रही मतही त्यांनी मांडलं. ज्येष्ठ भाषातज्ज्ञ डॉक्टर मिलिंद मालशे यांनी भाषांतर केलेल्या 'सोस्यूर ते चॉम्स्की' या पुस्तकाचं प्रकाशन करताना प्राध्यापक परांजपे बोलत होते. डॉक्टर मालशे म्हणाले की, विसाव्या शतकात सोस्यूर या स्विस अभ्यासकानं व्याख्यानांतून मांडलेली तत्त्वं आधुनिक भाषाविज्ञानाला पायाभूत ठरली. आणि विविध भाषाभ्यासकांनी त्यावर मंथन करून आपापले विचार निबंध आणि पुस्तक रूपांत मांडले. मराठी भाषेत हे विचार एकत्रित यावेत, हा भाषांतर करण्यामागचा एक महत्त्वाचा हेतू होता अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**लिंकिंग-यवतमाळ**

लिंकिंग केलेली खतं माथी मारून घ्यावी लागत असल्यानं यवतमाळ जिल्ह्यातील कृषी विक्रेत्यांच्या संघटनेनं लिंकिंग केलेली रासायनिक खतं खरेदी न करण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. शेतकरी सहजपणे उपलब्ध झालेला युरिया किंवा संयुक्त खतांसमवेत पुरवठा झालेली लिंकिंग खतं घ्यायला तयार होत नाहीत. परिणामी विक्रेत्यांना आणि शेतकऱ्यांनाही त्याचा भुर्दंड बसतो म्हणून कंपन्यांनी लिंकिंग बंद न केल्यास खतांची खरेदी बंद राहील अशी भूमिका विक्रेत्यांनी घेतली आहे.

**अपघात-रायगड**

मुंबईहून रत्नागिरीला जाणाऱ्या एका खासगी बसला काल रात्री दहाच्या सुमारास कर्नाळा अभयारण्याजवळ झालेल्या अपघातात एक जण ठार तर साधारण 32 जण जखमी झाले आहेत. जखमींना एमजीएम रूग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती नवी मुंबई नियंत्रण कक्षानं दिली.

**आयपीएल क्रिकेट**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज इलेव्हन संघानं लखनौ सुपर जाइंट्स संघाचा 37 धावांनी पराभव केला. पंजाबनं प्रथम फलंदाजी करताना प्रभसिमरन सिंगच्या 91 धावांच्या खेळीच्या जोरावर 236 धावा केल्या. तर लखनौला 199 धावा करता आल्या. कालच्या पहिल्या सामन्यात, यजमान कोलकाता नाईट रायडर्सनं ईडन गार्डन्सवर राजस्थान रॉयल्सवर एका धावेनं मात केली. 207 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, राजस्थान रॉयल्सने 20 षटकांत 8 बाद 205 धावा केल्या.

**हवामान**

उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी आज जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उद्यापासून नऊ तारखेपर्यंत या हवामानाची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार